## प्रेसनोट दि. १२.०२.२०१९

जत पेलीस ठाणे येथील श्री.राजेश वसंत कांबळे पोलीस नाईक बनं.४१९ नेम. जत पोलीस ठाणे यांना २०००/- रुपये लाच मागणी केलेवरून त्यांचे विरूध्द लाच मागणीचा गुन्हा दाखल. *सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.*

---

तक्रारदार यांचेवर जत पोलीस ठाणेमध्ये दाखल असले गुन्हयामध्ये तक्रारदार यांना जामीनावर सोडले त्याकरता व तक्रारदार यांचे विरूध्द पार्टीतील इसमावर गुन्हा दाखल करण्याकरता पोलीस हवालदार राजू कांबळे जत पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे ३०००/- रूपयेची लाच मागणी केली असलेबाबत तक्रारदार यांनी दि.२२.११.२०१८ रोजी तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २३.११.२०१८ रोजी केले पडताळणीमध्ये लोकसेवक श्री कांबळे पोलीस हवालदार यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रथम ३०००/- रुपयांची लाच मागणी करून तडजोडीअंती २०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लोकसेवक श्री कांबळे यांचे विरूध्द सापळा लावला असता त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम स्विकारली नाही. लोकसेवक श्री.राजेश वसंत कांबळे पोलीस नाईक बनं.४१९ नेम. जत पोलीस ठाणे यांचे विरुध्द आज दिनांक १२.०२.२०१९ रोजी जत पोलीस ठाणे येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून लोकसेवक श्री.राजेश वसंत कांबळे पोलीस नाईक यांना सदर गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा. श्री. संदीप दिवाण सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री. राजकुमार गायकवाड सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेंद्र साळुंखे पोलीस उप अधीक्षक व पोलीस कर्मचारी जितेंद्र काळे, भास्कर भोरे, संजय कलकुटगी, संजय संकपाळ, अविनाश सागर, बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(राजेंद्र साळुंखे)
पोलीस उप-अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली